| | |
|---|---|
| MHCO090005262025 | दाखल तारीख – १९/०८/२०२५<br>नोंदलेली तारीख – १९/०८/२०२५<br>निकाल तारीख – २८/०७/२०२६<br>कालावधी – **व. म. दि.**<br>०० ११ ०९ |

**कोर्ट विदयमान न्यायाधीश, सहकार न्यायालय क्र. २, कोल्हापूर.**
**( श्रीमती ए. ए. पुंड, न्यायाधीश यांचे समोर )**

........................................................................................................

**सहकार वाद क्रमांक ४९८/२०२५** **निशाणी – २०**

**वादीः**

**अडकुर वि.का.स. (विकास) सेवा संस्था मर्या.**

अडकुर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**प्रतिवादीः**

१. **नाना जोतीबा पाटील.**

व. व. ५०, धंदाः शेती.

२. **उत्तम आप्पा इंगवले.**

व. व. ४८, धंदाः शेती.

३. **बंडु गोपाळ चंदगडकर.**

व. व. ५२, धंदाः शेती.

अ.क्र. १ ते ३ रा.मु.पो. अडकुर,

ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**विवादः – रक्कम रुपये १,५०,०६७/– वसुलीसाठी.**

.................................................................................................

वादीतर्फे विधीज्ञ : – ॲड. जे. जे. आडनाईक

प्रतिवादी क्र. १ ते ३ :– एकतर्फा.

.................................................................................................

## न्यायनिर्णय

(घोषित निकाल दिनांक २८/०७/२०२६)

१. प्रस्तुत विवाद रक्कम रुपये १,५०,०६७/– वसुलीसाठी व त्यावर द.सा.द.शे. ६% व्याजदराने भविष्यातील व्याज मंजूर होऊन मिळणेकामी दाखल केलेला आहे.

**–: विवादातील कथने खालीलप्रमाणे :–**

२. वादी संस्था महाराष्ट्र सहकार कायदा, १९६० अन्वये नोंदणीकृत विकास सेवा संस्था आहे. वादी संस्थेचा व्यवसाय सभासदांना कर्ज पुरवठा करणे, खते व बि–बियाणे उपलब्ध करुन देणे इ. आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत.

३. वादी संस्थेची पुढे केस अशी की, वादीने प्रतिवादी क्र. १ यांना प्रतिवादी क्र.२ व ३ यांना जामीन देवून मेंबर ऊस कर्ज रुपये १,१०,०००/– चे कर्ज मंजूर करुन दिनांक ३०/०६/२०२२ रोजी वाटप केले. कर्जाचा मान्य व्याजदर ६ %

ठरला होता. सदर कर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ जामिनदार राहिले. प्रतिवादींनी विवादीत कर्जापोटी वादी संस्थेच्या लाभात कर्जरोखा इ. आवश्यक दस्त करुन दिले.

४. वादी संस्थेची पुढे केस अशी की, प्रतिवादी क्रमांक १ ने ठरल्याप्रमाणे कर्जाची परतफेड केलेली नाही. दिनांक ३१/०१/२०२५ रोजी वादीने प्रतिवादीना नोटीस पाठविली. नोटीस मिळून सुध्दा प्रतिवादींनी कर्जाची रक्कम परतफेड केली नाही. प्रतिवादीकडे खातेउतान्यानुसार मुद्दल व व्याज एकूण रक्कम रुपये १,५०,०६७/– येणेबाकी आहे. वादी संस्थेच्या मते विषयांकीत कर्ज परतफेडीची सर्व प्रतिवादींची वैयक्तीक व संयुक्तिक जबाबदारी आहे. वरील सर्व मुद्दयांच्या आधारावर वादी संस्थेने विवादाचा निवाडा मागणीप्रमाणे तिचे लाभात मिळावा अशी विनंती केलेली आहे.

५. संचिकेचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना विवादाची नोटीस निशाणी ५, ६ व ७ नुसार तामिल होऊन सुध्दा ते विवादात हजर झाले नाहीत. त्यामुळे विवाद प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश निशाणी १ वर पारित केलेला आहे.

६. वादीची दाव्यातील कथने विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यांची उत्तरांसहित कारणमिमांसा खालीलप्रमाणेः

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने त्यांचा दावा शाबित केला आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | वादींचा दावा मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ करिताः –**

७. विवादाची मागणी सिध्द करणेकामी वादी संस्थेतर्फे निशाणी १० वर श्री. आप्पा कृष्णा देसाई यांचा साक्षी पुरावा सादर केला. विवादाचे पुष्टयर्थ वादीने निशाणी ३ चे दस्त यादीसोबत कागदपत्रे सादर केलेली आहेत. निशाणी १९ वरील पुरसीस नुसार वादीने पुरावा बंद केलेला आहे. वादी विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. विवादात दाखल दस्त ऐवजांचे अवलोकन करण्यात आले.

८. निशाणी १० वर दाखल श्री. आप्पा कृष्णा देसाई यांचा पुरावा पाहता तो विवादातील कथनांशी सुसंगत असा आहे. कर्ज मगाणी अर्ज निशाणी १२, हमीपत्र निशाणी १३, वचनचिठ्ठी निशाणी १४, कर्जरोखा निशाणी १५, नोटीस निशाणी १६, पोहोच व लिफाफे यांना एकत्रीतपणे निशाणी १७, इ. च्या प्रमाणित प्रती पाहता सदरचे दस्त विषयांकीत कर्जासंबंधी असून त्यावर प्रतिवादींच्या सहया असल्याचे दिसून येते. निशाणी ११ वरील ठरावानुसार संस्थेने थकीत कर्जदारांविरुध्द कर्ज वसुली कार्यवाही करणेचा ठराव पारित केलेला आहे. उपरोक्त दस्त वादी साक्षीदाराने पुरावा कायदयानुसार सिध्द केलेले आहेत. निशाणी ११ वरील कर्ज रोख्या वर

कर्जाचा व्याजदर ६% इतका आहे. सबब वादी संस्था ६ % व्याज दराने भविष्य व्याज मिळणेस पात्र आहे. निशाणी १८ वरील खातेउतारा पाहता त्यानुसार प्रतिवादीकडे दि. ३०/०६/२०२३ अखेर मुद्दल, व्याजासह रुपये १,५०,०६७/– येणेबाकी दर्शविलेली आहे. प्रतिवादीने दाव्यात हजर होऊन वादीचा पुरावा आव्हानीत केला नाही. वादीचा पुरावा निर्विवादीत राहिला आहे. सबब वादीचा पुरावा ग्राहय मानावा लागेल.

९. विवादात दाखल उपरोक्त दस्त व वादी साक्षीदाराची निर्विवाद साक्ष विचारात घेता मी असे गृहीत धरते की, प्रतिवादी क्र. १ ने वादी संस्थेकडून रुपये १,१०,०००/– चे कर्ज उचल केले व त्यास प्रतिवादी क्र. २ व ३ जामिनदार राहिले असून सर्व प्रतिवादींनी उपरोक्त दस्त वादीचे लाभात करुन दिले. कागदपत्रांवरुन असेही दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ कडे विवाद रक्कम रुपये १,५०,०६७/– येणेबाकी असून त्यावर द.सा.द.शे. ६ % व्याजदराने परतफेडीची प्रतिवादी क्र. १ ची कर्जदार म्हणून व प्रतिवादी क्र. २ व ३ यांची जामिनदार म्हणून वैयक्तीक व संयुक्तिक जबाबदारी आहे म्हणून मी मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करिताः –</u>**

१०. मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष लक्षात घेता, मी या निष्कर्षाप्रत आले आहे की, वादी संस्थेचा विवाद खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र. ३ च्या निष्कर्षात खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादी संस्थेचा विवाद खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र. १ ते ३ ला आदेशीत करण्यात येते की, त्यांनी कर्ज रक्कम रुपये १,५०,०६७/– व त्यावर द.सा.द.शे. ६ % व्याजदराने दिनांक ०१/०७/२०२३ पासून ते सदर रक्कमेची व्याजासह पुर्ण परतफेड होईपावेतो होणारी सर्व रक्कम वादी संस्थेस वैयक्तीक व संयुक्तिकरित्या परतफेड करावी. |
| ३. | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

सही/–

**(श्रीमती ए. ए. पुंड )**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय क्र. २, कोल्हापूर.**

**ठिकाणः कोल्हापूर.**
**दिनांकः २८/०७/२०२६.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D.F. Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| **Name of Stenographer** | **:** | Smt. Sanjivani S. Ghatge<br>L. Stenographer. |
| **Court Name.** | **:** | **Judge, Co-operative Court No.2 Kolhapur** |
| **Date** | **:** | **28/07/2026** |
| **Judgment signed by presiding officer on** | **:** | **28/07/2026** |
| **Judgment uploaded on** | **:** | **28/07/2026.** |